॥ श्रीराम ॥

# - ओंजळ -

ओंजळ म्हटले म्हणजे आपले दोन्ही हात जवळ केले की ओंजळ होते.

आपण पुष्कळवेळा असे म्हणतो किंवा ऐकतो की ओंजळीत घाल. माणसाला तहान लागली तर पटकन ओंजळीने पाणि पीतो. आपल्या दाराशी कोणी भिक्षेकरी आला तरी आपण त्याच्या ओंजळीत भिक्षा घालतो.

आपण बघतो की माणसाला कधी दुःख झाले तर तो पटकन दोन्ही हात डोळ्यांवर धरून दुःखाला वाटकरून देतो.

सकाळी उठल्यावर सुर्याला अर्ध्य देताना पण ओंजळीत पाणी घेवून देतो.

एखाद्या प्रियकराने आपल्या प्रेयसीला तिच्या ओंजळीत फुले दिली तर सुंगध काही वेगळाच असतो.

पुर्वी आपण सवाष्णीची ओटी भरताना सुद्धा ओंजळीत तांदुळ, नारळ घेवून तिच्या ओटीत घालत होतो.


आता बदलत्या काळाप्रमाणे ओटी पण सर्व एखाद्या सुंदरशा पिशवीत सर्व एकत्र करून हातात देतात.

आपण नेहमीच्या व्यवहारात पण एखाद्याला म्हणून जातो की काय दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पितो.

लग्नामध्ये सुद्धा कन्यादान करताना हाताची ओंजळ एकमेकांच्या हातात देऊनच परस्परांच्या सहकार्याने विश्वासाने आणि प्रेमाने साथ देण्याची शपथ घेतली जाते. पण काहीही म्हणा ओंजळभर फुले घेऊन ती परमेश्वराच्या चरणांवर अर्पण केल्यावर तेच हात जोडले की तन, मन नतमस्तक होऊन जाते.

अशी ही ओंजळ मनुष्याच्या आयुष्यामध्ये किती महत्वाची आहे.

—x—



सुनिता श्रीधर पटवर्धन -
फो. नं. ९४०४६१३८५३

